# ऋणनिर्देश

मी इथेपर्यंत येऊ शकले ते मला घडविणारे माझे आजोबा स्व. गजानन उदगावे यांच्या प्रेरणेने व आर्शिवादानेच. एम्. ए. करीत असतानाच पुढे एम्.फिल करण्याचे ठरविले. या भावनेनेच मी एम्. फिल करण्याकडे वळले. त्यावेळी माझ्यासमोर शोध निबंधाच्या विषय निवडीचा प्रश्न होता. मी विषय निवडीसाठी माझ्या मार्गदर्शक डॉ. सौ. व्ही. पी. रासम मॅडम यांच्याशी प्रथम चर्चा केली. तेव्हा माझ्यातील स्त्री अभ्यासविषयाची आवड लक्षात घेऊन त्यांनी मला विषय निवडीसाठी मदत केली. तसेच या विषयाचा अभ्यास करताना अतिशय मोलाचे मार्गदर्शन केले. कारण मी संशोधनाच्या बाबतीत पूर्णपणे अनभिज्ञ होते. संदर्भ कसे घ्यावेत, कोणते घ्यावेत, संशोधनाचे टप्पे कसे पाडावेत इ. त्यांनी सांगितलेच. शिवाय झालेले लिखाण वेळोवेळी तपासून घेऊन, दोष दाखवून प्रसंगी परत लिखाण करावयास लावले. यामुळे माझे संशोधंन हे योग्य पद्धतीने झाले त्यामुळे त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत.

या कामी डॉ.कांबळेकर सरांनी नेहमी प्रोत्साहन दिले आहे. तसेच विभाग प्रमुख श्री लक्ष्मीनारायण तारोडी सर, डॉ. अशोक चौसाळकर सर, डॉ. मेघा नानिवडेकर मॅडम व प्रा. सौ. भारती पाटील मॅडम यांचेही मार्गदर्शन लाभले. आमचे कन्या कॉलेजचे सर श्री एस. ए. पाटील यांचे ही नेहमीच सहाय्य लाभले. शिवाय श्री तोरस्कर, श्री डवण व अरूण वणेरे यांनीही वेळोवेळी मदत केली.

माझ्या आजी, आई-वडील, वहिनी यांची ही मला संशोधनाच्या कामात मोठी मदत झाली. मैत्रीण अश्विनी कुलकर्णी तिचे आई वडील यांनीही मला मदत केली. या सर्वांची तसेच मला वेळोवेळी मदत करणारे मैत्रिणी आणि सहकारी यांची मी नेहमी ऋणी आहे.

कु.सुजाता उदगावे